# राज्य निवडणूक आयोग ,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/माजअ-२०१७/पी.सी./प्र.क्र.१/का-१०
१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२. दूरध्वनी-०२२-२२०४६९०९
दि. १८ जानेवारी २०१७

प्रति,
मा. संपादक/ प्रतिनिधी,
सर्व प्रसारमाध्यमे.

**विषय:** मा. राज्यपाल महोदय यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत...

महोदय,

राज्य निवडणूक आयोगातर्फे मतदार जागृतीसाठी बोधचिन्ह (Mascot) तयार करण्यात आले आहे. त्याचबरोबर 'कॉप' या नावाने मोबाईल ॲप विकसित केले आहे; तसेच मतदारांसाठी मिस्ड कॉल सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. बोधचिन्हाचे अनावरण व विविध सुविधांची सुरूवात; तसेच आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'च्या विशेषांकाचे प्रकाशन मा. राज्यपाल महोदय यांच्या हस्ते उद्या दि.१९ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता सह्याद्री अतिथिगृह येथे करण्यात येणार आहे. त्यासाठी आपण उपस्थित राहावे अथवा आपला प्रतिनिधी पाठवावा, ही विनंती.

**दिनांक** : १९ जानेवारी २०१७
**वेळ** : सायंकाळी ५.०० वाजता
**ठिकाण** : सह्याद्री अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई-३२.

(पत्रकारांसाठी सह्याद्री अतिथिगृह येथे जाण्याकरिता दुपारी ४.०० ते ४.१५ दरम्यान नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ३२ येथून वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.)

आपला,

(जगदीश मोरे)
जनसंपर्क अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र